# अमरावती शहर दैनंदीन गुन्हे अहवाल दि. २९/०४/२०२३

दुखापत:—

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | पोस्टे कोतवाली अप क्र १८६/२०२३ कलम ३२६,४९८ (A), २९४,५०६ (२) भादवि | अमरावती | घ.ता.वेळ - दिनांक २१.०४.२०२३ रोजी सकाळी ०७.३० वा दरम्यान दाखल ता.वेळ दिनांक २८.०४.२०२३ चे १६.३७ वा | एक महिला | पिडीत महिलेचा नवरा | हकिकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी हया त्यांचे सासु , सासरे, मुलगी व मुलगा असे मागिल १५ वर्षा पासुन अमरावती येथे राहण्यास आहे. आरोपी हा फिर्यादीचा नवरा असुन तो बाहेरगावी रेल्वे सुप्रीटेंडन या पदावर कार्यरत आहे व तो आठवड्याच्या सुट्टीला अमरावती येथे घरी येतो. फिर्यादीचे लग्न सन २००६ मध्ये रितीरिवाजा प्रमाणे आरोपी सोबत झाले असुन लग्ना नंतर आरोपी व सासर कडील लोक फिर्यादीचा मानसिक व शारिरीक छड करत असल्याने सन २०१८ मध्ये आरोपी विरीध्द पोस्टे सिटी कोतवाली येथे कलम ४९८ (A), भादावि प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर केस न्यायालयात प्रलंबित आहे सदर गुन्हा दाखल झाल्या नंतर अशी चुक होणार नाही असे आरोपीने कबुल केल्याने फिर्यादी तिच्या सासरी राहत होती. अधुन मधुन आरोपी अमरावती येथे येत होता व गोवा येथे प्लॉट घेण्यासाठी फिर्यादी कडे पैशाची मांगणी करीता होता नाही म्हटले तर शिवीगाळ करीत होता आरोपीच्या त्रासाला कंटाळुन फिर्यादीने मे २०२२ मध्ये ICICI बैंके कडुन पर्सनल लोन घेवुन आरोपीला पैशे दिले होते तसेच त्या आधि प्लॉट घेण्यासाठी ३ लाख रुपये दिले होते त्यानंतर जानेवरी २०२३ मध्ये आरोपी प्लॉट घेण्यासाठी पुन्हा पैशाची मांगणी करु लागला त्याबाबत आरोपीला विचारले असता पैशे खर्चझाल्याचे सांगितले तेव्हा फिर्यादीने पैशे दिले नसल्याने आरोपी हा बाहेरगावी गेला आणि मार्च महिण्या पर्यंत परत आला नाही. दिनांक २१.०४.२०२३ रोजी सकाळी ०६.३० वा फिर्यादी झोपेतुन उठली तेव्हा आरोपी घराच्या हॉल मध्ये झोपलेला दिसला. फिर्यादी ड्युटी करीता सकाळी ०७.४० वा जायचे असते म्हणुन घरातील दैनंदीन कामे आटपुन सकाळी ०७.३० वा गाडी घेवुन डयुटीला जायला निघाली असता आरोपी लाकडी काठी घेवुन फिर्यादी जवळ आला व फिर्यादीला अश्लिल शिवीगाळ करुन त्याच्या जवळील लाकडी काठीने फिर्यादीच्या डोक्यावर, दोन्ही हातावर, खांद्यावर, पाठीवर मारहाण केली. त्यावेळी आरडाओरड करित असल्याने दोन इसम वाचविण्यासाठी आले असता आरोपीने त्यांना आमचे घरघुती मॅटर आहे असे म्हणुन हाकलुन दिले त्यानंतर आरोपी तेथुन घराच्या मगिल बाजुस निघुन गेला. थोळ्यावेळाने सास-यांनी फिर्यादीला घरी नेले व आरोपीला बोलवुन सदर मारहानी बाबत विचारले असता आरोपीने हि तर फक्त सुरुवात आहे मि तुला जगुही देणार नाही, मरुही देणार नाही आणि तु जर माझे विरुध्द |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | पोस्टेला रिपोर्ट दिला तर तुला व तुझ्या आई वडिलांना मारुन टाकेल अशी धमकि दिली. दुपारी सासुने फिर्यादीला एक्सरे काढायला नेले असता हाताची कंडीशन क्रिटिकल आहे व लवकर ऑपरेशन करावे लागेल असे डॉक्टरांनी सांगितले त्यानंतर रात्री ०९.०० वा. ननद हिने फिर्यादीला हॉस्पीटल ला भरती केले. आरोपीने धमकी दिली असल्याने पोलीसांनी हॉस्पीटल मध्ये फिर्यादीचे बयाण नोंदविले तेव्हा फिर्यादी ही गाडीवरुन पडली अशी खोटी माहीती भिती पोटी सांगितली होती त्यानंतर आरोपीने मारहाण केल्या बाबत फोन व्दारे आई वडीलांना माहीती देवुन त्यांना अमरावती येथे हॉस्पीटल मध्ये बोलावुन घेतले फिर्यादीचे हाताला गंभीर दुखापत झाली असल्याने दिनांक २१.०४. २०२३ ते आज दिनांक २८.०४.२०२३ रोजी पर्यंत फिर्यादी उपचारासाठी सनशाईन हॉस्पीटल मध्ये भरती होत्या त्या दरम्यान डाव्या हाताचे ऑपरेशन करण्यात आले आहे अशा फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट वरुन डी ओ. सा यांचं आदेशाने सदरचा गुन्हा दाखल |

वाहणचोरीः—

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १. | पोस्टे राजापेठ अप क्र ३९६/२०२३ कलम ३७९ भादंवी | तापडीया मॉल समोर भिंती लगत अमरावती | दि. २७.०४.२०२३ चे २०/३० ते २१/३५ वा<br><br>दि. २८.०४.२०२३ चे १९/४० वा. | धर्मेंद्र भगवानजी दुपारे वय ४५ वर्ष रा शिवाजी नर अकोली रोड अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील घ. ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांनी घटणास्थळी गाडी लावुन मॉलमध्ये खाजगी काम आटोपुन गाडी ठेवलेल्या ठिकाणी पाहणी केली असता गाडी दिसुन आली नाही कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेली अशा फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुहा दाखल |

पळवुण नेणे :—

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पो स्टे गाडगे नगर अमरावती<br>अप क्र ५९०/२३ कलम ३६३ भादवी | अमरावती | दि २७-०४-२३ चे ०९.०० वा वा दि २८.०४.२३ चे आज पावेतो<br>दि २८.०४-२३ चे १९.५४ वा | पिडीत मुलीचे वडील | प्रशांत भारत देवळेकर रा घोडगाव पो स्टे कविठा ता अचलपुर जि अम. | यातील हकीकत अश्याप्रकारे आहे कि नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांची मुलगी वय १७ वर्ष हि कॉलेज मध्ये जाते असे सांगुन निघुन गेली व तेथुन कॉलेज मधुन परत आली नाही तिचा शोध घेतला असता मिळुन आली नाही.तसेच फि चे पुतण्या याने फिर्यादीचे मुलीचे त्याचे मोबाईलवर स्टेटस चे फोटो दाखविले तर फिर्यादीला समजले की त्यांची मुलगी हिला आरोपीने पळुन गेले आहे. अशा फीचे जबानी रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल |

विनयभंग :—

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे फ्रेजपुरा अप क्र ३०८/२०२३ कलम २०२३ कलम | दा ता वेळ -- २८.०८.२०२३ चे १५.०० वा<br><br>घ ता वेळ २८.०४.२०२ | अजिंक्य विठ्ठल जगताप वय ३२ वर्ष रा नेरपरसोपंत जि यवतमाळ | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हीने पो स्टे ला येवुन जबानी रिपोर्ट दिला की, ती नर्स म्हणुन चार महिण्यापासुन काम करते. यातील आरोपी आणि फिर्यादी यांनी एका हॉस्पीटल मध्ये कोवीड सेंटरमध्ये सोबत काम केले फिर्यादी तेव्हा पासुन आरोपी सोबत चांगली ओळख झाली. फिर्यादी व आरोपी मिळुन एका फलँट मध्ये तीन चार महीणे सोबत राहले आरोपीसोबत फिर्यादीचा वाद झाल्याने वेगळे राहत होतो आरोपी हा जुन २०२१ पासुन फिर्यादीचा सतत पाठलाग करुन फिर्यादी सोबत बोल म्हणत होता फिर्यादी त्याचे सोबच बोलत नसल्याने फिर्यादीला आत्महत्या करण्याचा व फिर्यादीला मारण्याची धमकी देत होता. फिर्यादीने त्याबाबत पो स्टे गाडगेनगर अमरावती येथे रिपोट दिला होता. आज दि. २८.०४.२०२३ रोजी दुपारी ०३.०० वा सुमारास फिर्यादी हॉंस्पीटल मध्ये पुरुष मेडीसीन वार्ड मध्ये डयुटी करीत असतांना आरोपी हा आला फिर्यादीला दुरुन दिसल्याने वार्ड मध्ये लपण्याचा प्रयत्न केला तर आरोपीला फिर्यादी दिसली तो फिर्यादीच्या जवळ येवुन थापड मारुन आरोपी बेडवर बसला व तु मझ्या सोबत बेडवर बस असे म्हणुन त्याने त्याचे अंगावर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ३५४, ३५४(ड) ,५०६ भादवी | ३ चे १८.५० वा | | फिर्यादीला ओढले. फिर्यादीला लज्जा निर्माण झाली व फिर्यादीचा विनयभंग केला. फिर्यादीच्या हातातुन त्याने फिर्यादीला मोबाईल घेवुन दुस-्या बेडवर फेकला त्याच वार्डात दुस-या नर्स ने मधात येवुन फिर्यादीच्या सोडवले. फिर्यादीने म्हटले की, तुझा रिपोर्ट देते म्हणुन वार्ड मधुन हॉंस्पीटलच्या खाली आली तर फिर्यादीच्या गावातील एक ईसम दिसला फिर्यादीने त्याला म्हटले की तु कसा काय आला तर त्याने म्हटले की, मी अजिंक्य सोबत जॉंब पहायला आल्याचे सांगीतले. आरोपी याने त्याची मोटर सायकल फिर्यादीच्या समोर एकदम आणली तुला एखाद्या दिवशी मारतो अशा धमक्या दिल्या व तेथुन निघुन गेला अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

ईतर :—

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | पो.स्टे. फ्रेजरपुरअम ा.शहर अप क्र. ३०९/२०२३ कलम ५०४, ५०६(२),३८५ भादवि | फ्रेजरपुरा वडरपुरा अमरावती | दि.२८/०४/२०२३ चे १७.०० वा दा.ता.वेळ दि.२८/०४/२०२३ चे २३.११ वा | अमशुमन ओमप्रकाश दायमा वय ३० वर्ष,रा. विद्या कॉलनी कोर्टच्या मागच्या बाजुला अमरावती | किसना मंजुळकर उर्फ किसन गोटी, वय ५० वर्षरा. वडरपुरा अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, किसना मंजुळकर उर्फ किसन गोटी, वय ५० वर्ष रा. वडरपुरा अमरावती ने दि. २८/०४/२०२३ चे १७.०० वा फ्रेजरपुरा वडरपुरा अमरावती येथे भर रस्त्यावर गाडी समोर उभी करुन घाणेरडे शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली. तसेच या पुर्वी च्या दाखल तक्रारीत खंडेलवाल केस तक्रार मधे माझ्या विरुध्द तक्रारीत तुझी गवाही मागे घे नाहीतर तुला मारुन टाकील तसचे तुझे काका खंडेलवाल यांच्या कडुन दोन लाख रुपये खंडणी आणुन दे अन्यथा तुला जगणे मुश्कील करेल मी फार मोठा तडीपार गुंडा आहे इतक्या वर्षात पोलीस सुध्दा माझे काही वाकडे करु शकले नाही माझा कडे गुंडाची फौज आहे तुला जगातुन संपुन टाकेल गुंडे मुले पाठवुन तुझ्या मांड्यावर चाकु मारण्याल लावतो माझ्या जिवीतास किसना मंजुळकर उर्फ किसन गोटी, वय ५० वर्षरा. वडरपुरा अमरावती याचे कडुन धोका आहे तरि त्याच्यावर गुन्हा दाखल काराव अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २ | बडनेरा अप.नं. ३१२/२३ कलम २७९ भा.दं.वि. सह कलम ५(अ), ५(ब) | सुपर हायवे रोड, अकोला वाय पॉंईट, बडनेरा. | घटना ता वेळ -दि. २८.०४.२३ चे १३.४२ वा. माहीती वेळ - -दि. २८.०४.२३ | सरतर्फे पोहेका शैलेश मोरे ब.नं.१०२९ पोस्टे बडनेरा अमरावती शहर | १)सुधीर भोलाराम चुटे, वय ३४ वर्षे, धंदा - ट्रक चालक, रा. कुणबी मोहल्ला, कारंजा, ता. लांजी, जि. बालाघाट, राज्य मध्यप्रदेश २) शहेबाज वल्द शेख लाल कुरैशी, वय २१ वर्षे, धंदा | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील नमुद वेळी पो. स्टे बडनेरा येथे नियंत्रण कक्ष, अमरावती शहर येथुन माहीती मिळाली की, एक ट्रक गोवंशाची अवैधरित्या वाहतुक करीत असुन सदर ट्रकने नांदगाव पेठ येथील टोल नाका तोडुन सुपर हायवेने अकोला कडे जात आहे. अशा माहीतीवरून पो.स्टाफच्या मदतीने अकोला वाय पॉंईट येथे नाकाबंदी करून सदर ट्रक क्र. MH-०६-AC-२४९१ डिटेन करण्यात आला. त्यामधील आरोपी चालक व आरोपी क्लिनर पळुन जात असतांना लोकांनी त्यांना पकडुन मारहाण केली. सदर ट्रक मध्ये ३० लहान मोठे गोवंश जनावरे निर्दयतेने कोंबलेली होती. नमुद आरोपी क्र. १ व २ यांना जनावरांबाबतच्या कागदपत्रांबाबत विचारणा केली असता त्यांनी कोणतेही कागदपत्रे सादर केली नाहीत. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र प्राणी रक्षण (सुधारणा ) अधिनियम १९९५, सह कलम ११(१)(d), ११(१)(f) प्राण्यांना क्रुरतेने वागविण्यासा प्रतिबंधक करणारा अधिनियम १९६०, सह क लम ११९ महा .पो. का. | | चे १३.४२ वा दाखल ता. वेळ -दि. २८.०४.२३ चे १८.२१ वा. | | जप्त ट्कचा कंडक्टर, रा. हमीदनदक. पिलीनदी, नागपुर ३) अमजद, रा. अमरावती.(पुर्ण नाव माहीत नाही) | सदर गोवंश जनावरे ही आरोपी क्र. ३ याचे असल्याचे दोन्ही आरोपींनी सांगितले. अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्टवरून सदरचा गुन्हा दाखल |